महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : नववा दिनांक : 23/09/2024 वार : सोमवार

## सत्यपाल मलिक यांचा मविआला पाठिंबा

### उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर घेतली भेट, भाजपवरही साधला निशाणा





**मुंबई (प्रतिनिधी)** :राज्याची विधानसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतशी राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी रविवारी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगत आहेत.

जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी मुंबईतील मातोश्री येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी मलिक यांनी आगामी विधानसभा निवडणुकीवर भाष्य करत भाजपवर टीका केली आहे. विधानसभा निवडणुकीत आपला महाविकास आघाडीला पाठिंबा आहे. निवडणुकीत प्रचार सभांसाठी महाराष्ट्रात येणार आहे. या निवडणुकीत महायुतीसह भाजपचा पराभव होणार आहे, असे ते म्हणाले.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक देशातील राजकीय परिस्थितीवर परिणाम करेल, असे मलिकांनी म्हणले आहे. मुंबईतील नागरिक संस्थेच्या कार्यक्रमात सत्यपाल मलिक बोलत होते. सत्यपाल मलिक यांनी हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीवर भाष्य केले आहे. काँग्रेस हरियाणामध्ये जवळपास 60 जागा जिंकेल. तर भाजप केवळ 20 जागा जिंकेल. 2019 च्या पुलवामाच्या हल्ल्यात 40 सीआसपीएफ जवानांचा मृत्यू झाला. या हल्ल्याची व्यापक चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

सत्यपाल मलिक यांनी काल एका कार्यक्रमात बोलताना पुलवामा हल्ल्याच्या चौकशीचा मागणी केली होती. पुलवामाच्या हल्ल्याच्या तिसऱ्या दिवशी भाजपने या घटनेचे राजकारण केले. त्यामुळे लोकांनी मतदानावेळी या गोष्टी लक्षात ठेवाव्यात. पुलवामा हल्ल्यात 40 जवानांचा मृत्यू झाला. या हल्ल्याची चौकशी व्हावी, अशी मागणी मी करत आहे. आपले जवान कसे मारले गेले, हे लोकांना कळाले पाहिजे, असे ते म्हणाले होते.

## महायुतीमधील वाद चव्हाट्यावर

### भोसरी-चिंचवड मतदारसंघावरून तेढ निर्माण, अजित पवार गटाचा ठराव मंजूर



**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या जागावाटपावर एकमत नसल्याचे दिसून येत आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप पक्षानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाने देखील वेगळा ठराव मंजूर केला आहे. भाजपने पिंपरी-चिंचवड विधानसभेवर दावा केला आहे. यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाने भाजपच्या वाट्याला असणाऱ्या भोसरी-चिंचवड जागा राष्ट्रवादीसाठी घेण्याचा ठराव मंजूर केला आहे.

भाजप राष्ट्रवादीचा प्रचार करणार नसेल तर आम्ही भोसरी आणि चिंचवडमध्ये प्रचार न करण्याचा निर्णय घेऊ शकतो, असा इशारा अजित पवार गटाने दिला आहे. या बैठकीत अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे उपस्थित होते. तसेच भाजपने बनसोडे यांचा विरोध केला असल्याने बनसोडे समर्थक देखील आता आक्रमक झाले असल्याचे दिसत आहे.

आमदार अण्णा बनसोडे म्हणाले, ज्या पक्षांचे ज्या ठिकाणी आमदार असणार आहेत, ती जागा त्या पक्षाच्या आमदारासाठी सोडण्यात येणार आहे. असा निर्णय महायुतीमधील सर्व पक्षांनी घेतला आहे. हा मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेसचा आहे. विद्यमान आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेसचा आहे. त्यामुळे ही जागा देखील राष्ट्रवादीलाच मिळाली पाहिजे. काही लोकांना हा मतदारसंघ आपल्याला मिळावा असे वाटत आहे. शेवटी युती धर्म म्हणून वरिष्ठ पातळीवर जो निर्णय होईल त्यासाठी आम्ही बांधील आहोत, असे बनसोडे म्हणाले.

पिंपरी विधानसभेत अजित पवार गटाचा प्रचार करायचा नाही, असा ठराव भाजपने केला आहे. त्यामुळे भाजपने थेट आमदार अण्णा बनसोडे यांना विरोध दर्शवला आहे. लोकसभेत अजित पवारांच्या राष्ट्रवादीने महायुतीचा प्रचार केला नाही मग आपण घडाळ्याचा प्रचार का करायचा? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

या सर्व घटना पाहता आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीमध्ये जागांवरून एकवाक्यता नसल्याचे दिसत आहे. याचा फटका निवडणुकीत बसण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. मात्र अखेर महायुतीमधील वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो मान्य असेल असेही एकीकडे बोलले जात आहे.

## पराभव समोर दिसताच भाजपचा रडीचा डाव

### धार्मिक व जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न, विजय वडेट्टीवारांची टीका



**मुंबई (प्रतिनिधी)** : भाजप आमदार नीतेश राणे यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी चांगलाच समाचार घेतला. भाजपच्या नेत्यांनी दिलेल्या अजेंड्याप्रमाणे ते बोलत आहेत. असे वादग्रस्त वक्तव्य करून आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न सुरू आहे. पराभव समोर दिसताच भाजपचा रडीचा डाव सुरू आहे, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, भाजप निवडणुका हरत आहे. त्यामुळे मतांच्या ध्रुवीकरणासाठी धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मृताच्या टाळूवरील लोणी खाण्याची भाजपची नीती असून तेच नितेश राणे यांच्या मुखातून बाहेर येत आहे.

महाराष्ट्रात भाजपला निवडणूक नको असेल तर त्यांच्याकडून दंगली घडवल्या जातील. त्यामुळे महाराष्ट्र अस्थिर आहे, म्हणून निवडणुका पुढे ढकला, असा अहवाल राज्यपालांमार्फत देउ शकतात. लाडकी बहीण योजना आणूनही आपला पराभव पुढे दिसत असल्याने असा रडीचा डाव खेळला जात आहे. जितक्या निवडणुका लांबणीवर टाकताल, तितकी महाविकास आघाडी भक्कम होईल, असा विश्वास देखील वडेट्टीवार यांनी व्यक्त केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, नितेश राणे यांनी काँग्रेसमध्ये असताना हाफ चड्डीवाले जातीयवादी आहेत. ते आरक्षण देउ शकत नाही, अशी टीका आरएसएसवर केली होती. मात्र आता सत्तेच्या खुर्चीवर असताना ते दोन धर्मांत आग लावण्याचे काम करत असतील तर सरकारने त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. परंतु, त्यासंदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट होत नाही. याचा अर्थ भाजपला महाराष्ट्रात दंगली घडवून, राज्य अस्थिर करायचे आहे. निष्पाप लोकांचा जीव घ्यायचा आहे. ही भाजपची सत्तेसाठी असलेली नीती आहे.

## महाराजा अग्रसेन जयंतीनिमित्त नेत्ररोग तपासणी, रक्तदान शिबिर

### महानगरात निघणार शोभायात्रा, अग्रवाल समितीचा पुढाकार



**अकोला** : सकल अग्रवाल समाजाचे आराध्य महाराजा अग्रसेन यांच्या जयंतीची तयारी अग्रवाल समितीच्यावतीने प्रारंभ करण्यात आली आहे. या सोहळ्यात नेत्ररोग तपासणी, रक्तदान शिबिर, विविध कलागुणांना वाव मिळावा, यासाठी विविध स्पर्धा होणार आहेत.

महानगरात सकल अग्रवाल समाज अग्रसेन जयंती साजरी होणार आहे. या जयंती उपक्रमाचा प्रारंभ शुक्रवार, २७ सप्टेंबरपासून अग्रसेन भावनात होणार आहे. अग्रवाल महिला मंडळातर्फे मेहंदी, पाककला, फुलांच्या पानांची रांगोळी, राम दरबार, फॅन्सी ड्रेस स्पर्धा होणार आहे. अग्रवाल नवयुवती मंडळाच्यावतीने किड्स मास्टर शेफ स्पर्धा व शिवनी (मध्यप्रदेश) येथील व्याख्याता मनीषा अग्रवाल महाराजा या अग्रसेनजी यांच्या जीवनावर व्याख्यान सादर करणार आहे. ३ ऑक्टोबर रोजी पोलिस लॉन येथे जयंती सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून एलआयसीचे संचालक अनिल गुप्ता, सहाय्यक पोलिस अधीक्षक अनमोल मित्तल, अभिनेत्री ईशा अग्रवाल आदी उपस्थित राहणार आहेत. जयंतीनि◌िमत्त राणी सती धाम येथून महाराजा अग्रसेन यांच्या प्रतिमेची शोभायात्रा महानगरातून काढण्यात येणार आहे. या जयंती सोहळ्यात अग्रवाल समाजातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते स्व. गोकुलचंद रामधन गोयनका यांना मरणोत्तर समाजातील मानाचा अग्रविभूती पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या उपक्रमात समाजाच्या महिला, पुरुष ,युवक, युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अग्रवाल समितीचे अध्यक्ष दीपक गोयनका, सचिव विनोद टोरका, अग्रसेन भवन ट्रस्टचे अध्यक्ष गिरीश अग्रवाल ,सचिव शैलेंद्र कागलीवाल, महाराजा अग्रसेन भवन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. डी.डी. तुलशान, महिला मंडळाच्या अध्यक्षा ममता अग्रवाल आदींनी केले आहे.

नेत्ररोग तपासणी, रक्तदान शिबिरांचे आयोजन ◌: शनिवारी २८ सप्टेंबर रोजी सकाळी अग्रवाल नवयुवती मंडळाच्या वतीने अग्रसेन भवन येथे नेत्ररोग तपासणी शिबिर होणार आहे. यात नेत्र तज्ज्ञ डॉ. जुगल चिराणीया, डॉ. विजय खेतान, डॉ. राजेश मुरारका,डॉ. पूजा खेतान नेत्र तपासणी करणार आहेत.

रविवारी २९ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता अग्रवाल नवयुवक मंडळाच्यावतीने लहान मुलांसाठी ट्रायसिकल, लेमन रेस स्पर्धा, चॉकलेट शोधा स्पर्धा, संगीत खुर्ची व फुगे फोडा स्पर्धा व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

गुणवंतांचा सत्कार ◌: अग्रवाल नवयुवक मंडळाच्यावतीने जवाहर नगर परिसरातील महाराजा अग्रसेन भवनात आनंद मेळाचे आयोजन करण्यात आले. २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अग्रसेन भवन, न्यू राधाकिशन प्लॉट येथे अग्रवाल समितीच्यावतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर दुपारी ३ वाजता नवयुवती मंडळाच्यावतीने कॉमेडी शो विथ कॅरेक्टर, भाजी चिरणे, इंस्टाग्राम बनवणे व नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. फुलबत्तीपासून रांगोळी निर्माण, भिंतीवर नवरात्री पूजा मांडणे आदी स्पर्धा होणार आहेत.

महिलांसाठी विविध स्पर्धा, आरोग्य तपासणी १ ऑक्टोबरला अग्रवाल महिला मंडळातर्फे नवरात्री मटकी सजवा, मेकअप, पोस्टर निर्माण व महिलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या सोबतच होमिओपॅथी शिबिर आयोजित केले असून, त्यामध्ये डॉ. प्रीती अग्रवाल, डॉ. आरती गोयनका, डॉ. अंजली अग्रवाल सोनालावाला आरोग्य तपासणी करणार आहेत.

प्रवेश सुरू ! प्रवेश सुरू !! प्रवेश सुरू !!!

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

Sanitary Health Inspector

या कोर्ससाठी प्रवेश चालू आहेत

संपर्क : 9405109103, 8830838903




बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

